# भारतातील जाती

## त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास



# Caste in India

## Their Mechanisam, Genesis & Development

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# भारतातील जाती

## त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास

## Caste in India

### Their Mechanism, Genesis & Development


लेखक

भीमराव रामजी आंबेडकर

M.A., PH.D., D.sc., LL.D., D.LITT., BARRISTER-AT-LAW



प्रकाशक

**प्रबुध्द भारत प्रकाशन**

नागपूर

भारतातील जाती- त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास

**Caste in India- Their Mechanism, Genesis & Development**

लेखक : भीमराव रामजी आंबेडकर

© प्रकाशक : **प्रबुध्द भारत प्रकाशन**
पंचशील नगर, नागपूर-१७
मो. ९८५०३३२२९६

प्रथम आवृत्ती : ६ डिसेंबर २०१२

मुखपृष्ठ : सोनू ग्राफ्रीक, नागपूर

मुद्रणस्थळ : श्रीसमर्थ ऑफसेट, नागपूर

किंमत ₹ : २०/-

# भारतातील जाती-
## त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास

मी निःसंकोच म्हणू शकतो की, आपणापैकी बहुतेकांनी मानवी संस्कृतीला संपूर्ण स्वरूपात सादर करणारी स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संग्रहालये बघितलेली आहेत. यासारखेच मानवी संस्थांचे प्रदर्शन मांडलेले पाहून अनेकांना आश्चर्य मात्र नक्कीच वाटेल. मानवी रूढींचे प्रदर्शन ही कल्पना फारच थोड्यांना रूचणारी आहे. अर्थात मानवी रूढीचे प्रदर्शन ही कल्पना चमत्कारीक व आश्चर्यकारक वाटते. ती अत्यंत बाष्फळ कल्पना आहे, असे कुणीही म्हणोत. पण मानववंशशास्त्राचा विद्यार्थी या नात्याने मला आशा आहे की, या अभिनव कल्पनेविषयी कठोरता आपण बाळगणार नाही, कारण ही कल्पना अशी नाही. कमीत कमी आपणास तरी ही कल्पना चमत्कारिक वाटू नये. आपणापैकी बहुतेकांनी ऐतिहासिक स्थळांना भेट दिलेली असेल. पॉम्पेइच्या ध्वंसावशेषासारख्या एखाद्या स्थळाला आपण नक्कीच भेट दिलेली आहे आणि येथील गाईडच्या तोंडून या अवशेषांचा इतिहास नक्कीच विशेष शैलीत ऐकलेला आहे. माझ्या मते मानववंशशास्त्राचा विद्यार्थी हा देखील एका अर्थाने त्या गाईडसारखाच असतो. अधिक गंभीरतेने व स्वअर्जित ज्ञानाच्या बळावर या सामाजिक संस्थांना शक्य असेल तेवढे निष्पक्षतापूर्वक तो निरीक्षण करतो व त्यांची उत्पत्ती आणि कार्यप्रणालीचा शोध तो लावतो.

'आदिकालीन विरूद्ध आधुनिक समाज' हा विषय असलेल्या या चर्चासत्रात माझ्या अनेक मित्रांनी आपापल्या परीने आधुनिक व प्राचीन संस्थेविषयी आपली विचारसरणी मांडलेली आहे. आता माझी पाळी आहे. माझ्या निबंधाचा विषय आहे – **'भारतातील जाती : त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास.'**

ज्या विषयासंबंधी मला विचार मांडायचे आहे तो विषय किती कठीण आहे हे आपणास माहित आहेच. यापूर्वी माझ्यापेक्षा अधिक योग्य असलेल्या आणि अधिकारी मानल्या गेलेल्या विद्वानांनी जातींच्या रहस्यांना उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु दुर्दैवाने अद्यापही जातींची रहस्ये ही 'न उलगडलेली' अशी राहिलेली आहेत. मी जातीसारख्या क्लीष्ट विषयाविषयी जागरूक आहे आणि जातीविषयक रहस्ये ही न उलगडून सांगण्याइतके अगदीच अशक्य आहे,

असे म्हणण्याइतपत मात्र मी निराशावादी नाही. मला विश्वास आहे की, जातींची रहस्ये उलगडून ही जाणून घेता येवू शकतात. जातीसमस्या ही तात्विक आणि व्यावहारिकदृष्ट्या एक विशाल समस्या आहे, व्यावहारिकदृष्ट्या ती एक रूढी आहे. म्हणायला तर ही एक समस्या आहे. परंतु तिचे दुष्परिणाम मात्र तेवढेच विशाल आहेत.

**'जोपर्यंत भारतात जातींचे अस्तित्व शिल्लक आहे तोपर्यंत हिंदू क्वचितच मिश्र विवाह करतील अथवा अहिंदूशी कुठल्याही प्रकारची सामाजिक देवाणघेवाण करतील आणि जर हिंदू लोक जगाच्या पाठीवर कुठेही गेले तरी 'भारतीय जाती' या जागतिक समस्या बनतील.'** तात्विकदृष्ट्या जातींची जळेमुळे शोधण्याचे काम परिश्रमपूर्वक करणाऱ्या मोठमोठ्या विद्वानांना तिने (जातीने) आव्हान दिलेले आहे. अशा परिस्थितीत संपूर्णपणे मात्र मी आपले समाधान करू शकणार नाही. एका निश्चित कक्षेबाहेर जावून जर या समस्येचे वर्गीकरण न करता मी स्पष्टीकरण केले तर वेळ, अवाका आणि बुद्धीकौशल्य मलाच अपयशी करेल. ज्याविषयी मी माझी मते मांडणार आहे तो विषय आहे - **'जातींची संरचना, उत्पत्ती आणि विकास'** आणि जिथे कुठे आवश्यकता भासेल तेथेच स्पष्टीकरण करीत अतिरिक्त गोष्टींवर भर देईन.

आता विषयाकडे वळू. प्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञांच्या मते भारतीय समाज हा आर्य, द्रविड, मंगोल आणि शक यांच्या मिश्रणापासून बनलेला आहे. ह्या सगळ्या प्रजातींनी अनेक देशातून दिशादिशांनी आणि नाना संस्कृतीसह अनेक शतकापूर्वी आपल्या पूर्ववर्तींना पराभूत करून या देशात प्रवेश केला आणि नंतर शक्तीशाली बनल्यावर जम बसून शांतताप्रिय शेजारी म्हणून स्थायीक झाले. यांच्यातील सतत संपर्क आणि परस्पर संबंधातून एका सामाजिक संस्कृतीचा विकास झाला आणि तीत तयांच्या भिन्न संस्कृतीचा लोप झाला. तेव्हा भारतीय समाज हा भिन्न जातींपासून बनलेला आहे, असे म्हणणे असंगत आहे. संपूर्ण भारत भ्रमण केल्यानंतर आपणास या गोष्टीची साक्ष पटते की भारतीय समाजात हे गृहीत धरूनच चालले पाहिजे की, भारतीय समाज घडविणाऱ्या नानाविध समूहांचा परिपूर्ण मिलाप अद्यापही घडून आलेला नाही. संपूर्ण भारत भ्रमण केल्यानंतर आपल्या लक्षात येते की, भारतीय समाज हा विभिन्न शारीरिक लक्षणे असलेल्या लोकांनी बनलेला आहे. विशेषतः उत्तर भारत व दक्षिण भारतातील शरीर संरचना व वर्ण संबंधात बराचसा विरोधाभास दिसून येतो. तेव्हा या सर्वांचा मिलाप घडून आल्यानेच केवळ एकजीनसी समाज घडत नसतो. वांशिकदृष्ट्या सर्व भारतीय समाज हा भिन्न प्रजातींपासून बनलेला आहे. परंतु या सर्वांच्या संकलनातूनच भारतीय समाजाची जडणघडण झालेली आहे. या आधारावरूनच मी हे म्हणू

शकतो की, भारताइतकी क्वचितच सांस्कृतिक एकता इतरत्र आढळते. आम्ही केवळ भौगोलिकदृष्ट्याच एक नाही तर सांस्कृतिकदृष्ट्यादेखील चारही दिशांनी समरस झालेले लोक आहोत. तथापि ह्या एकजिनसीपणामुळेच जात ही स्पष्टीकरण करण्याइतकी अवघड समस्या बनते. भारतीय समाज हा जर केवळ भिन्न प्रजातीचे केवळ संमिश्रण असता तर गोष्ट निराळी असती. परंतु जात हे आधीच एकजीनसी असलेल्या घटकाचे विभाजन होय आणि जातीच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण म्हणजेच ह्या विभाजनप्रक्रियेचे स्पष्टीकरण होय.

जातींच्या संरचनेवर विचार करण्याअगोदर वंशशास्त्राच्या शास्त्रज्ञांच्या काही व्याख्यांकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

१. **फ्रेंच विद्वान सेनार्ट यांच्या मते,** 'तीव्र वांशिक आधारावर एक घनिष्ठ संघटित संस्था, विशिष्ठ पारंपरिक आणि स्वतंत्र संघटनांनी युक्त ज्यामध्ये एक प्रमुख पंचायत असते, ज्यांच्या बैठकी वारंवार भरतात, काही उत्सवोप्रसंगी मेळे भरविण्यात येतात. जातीतील सर्व लोकांचा एकसारखा व्यवसाय असलेला ज्यांचे संबंध केवळ रोटी-बेटी आधारावर असलेला, जातीत व्यक्तींची मर्यादा जातीनियमांनी ठरवून दिलेली व वेळप्रसंगी नियम मोडणाऱ्यांना शिक्षा आणि बहिष्कारसुद्धा घडवून आणणारा सक्षम असलेला समाज. त्यातही जातीनियमाबाबत कठोर असलेला समूह.

२. **नेसफिल्डच्या मते,** 'जमातीचा एक वर्ग जो अन्य कुठल्याही वर्गाशी कसल्याही प्रकारचा संबंध नाकारतो आणि आपल्या स्वतःच्या जमातीतील लोकांव्यतिरिक्त अन्य कुणाशीही सोयरिक करू शकत नाही वा खानपान करू शकत नाही.'

३. **सर एच. रिजले यांच्या मते,** 'जातीचा अर्थ आहे कुटुंब किंवा कुटुंबाचे मिळून बनलेले संगठन. सामायिक नाव असलेले, विशिष्ट व्यवसायाशी संबंधित असलेले, एखाद्या दैवी किंवा पौराणिक पितरांचे वंशज असल्याचा दावा करणारे आणि वंशपरंपरागत व्यवसाय अनुसरण करणारे एकजीनसी लोक म्हणजे जात होय.

४. **डॉ. केतकर यांच्या मते,** 'जात ही केवळ त्याच समूहात जन्माला आलेल्यांची मिळून बनत असते व कठोर सामाजिक नियमांनी व्यक्तीला समाजाबाहेर विवाह करण्यास सदस्यांना सक्त मनाई असते.

आपल्या उद्दिष्टांसाठी या व्याख्यांचे परीक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे स्पष्ट आहे की तीन वेगवेगळ्या विद्वानांच्या व्याख्यांकडे बघितल्यास त्यांच्यात काही महत्वपूर्ण बाबी आहेत तर काहीत फार कमी महत्वपूर्ण बाबी आहेत. माझ्या दृष्टिकोणातून यापैकी कोणतीच व्याख्या परिपूर्ण किंवा बिनचूक नाही. या सगळ्या

व्याख्यांमधून जातीच्या जडणघडणीचा मध्यवर्ती मुद्दा हुकलेला आहे. त्यांची चूक ही की समूह अंतर्गत जातींची घडण ही एक समूह म्हणून झालेली नसून स्वतंत्रपणे जातींची निर्मिती झाली हे तत्व होय. यासर्वच व्याख्या एकमेकांना पुरक अशा आहेत. जे तत्व एका विद्वानाने सोडलेले आहे ते तत्व दुसऱ्याने दर्शविलेले आहे. वरील प्रत्येक व्याख्येतील सर्व जातींना समान जातीची वैशिष्ट्ये तेवढीच मी विचाराकरिता घेईन व त्यांचे त्याचप्रमाणे मूल्यमापन करेल.

सेनार्टपासून प्रारंभ करू. एक स्वभाववैशिष्ट्य म्हणून तो आपले लक्ष विटाळाच्या कल्पनेकडे वळवितो. या मुद्याकडे लक्ष दिल्यास असे निर्विवादपणे म्हणता येईल की कुठल्याही परिने विटाळाला जातीचे वैशिष्ट्य म्हणता येणार नाही. विटाळ हा सामान्यतः पूजा-समारंभासंबंधात उद्‌भवते व शुद्धतेच्या सामान्य तत्वाशी संबंधित आहे. परिणामतः या कल्पनेचा संबंध जातीशी नाही. जातीच्या कार्यकलापांशी विसंगती न धरता जातीशी विटाळाचे अविभाज्य संबंध नाकारले जाऊ शकते. विटाळाच्या कल्पनेचा संबंध जातीशी जोडण्यात आला आहे, कारण ते फक्त याचमुळे की सर्वात उच्च दर्जा भोगणारी जात ही पुरोहितांची जात आहे. अर्थात आपणास हे माहितच आहे की पुरोहित आणि पवित्रता यांचे सख्य हे जुनेच आहे. म्हणूनच आपण या निष्कर्षापर्यंत येतो की, विटाळाची कल्पना ही फक्त तेव्हाच जातीचे स्वभाववैशिष्ट्य बनते, जोपर्यंत जातीला धार्मिकतेचा स्वाद असतो. नेसफिल्डच्या जातीचे वैशिष्ट्य म्हणून मुद्याचे नाविण्य जमेस धरूनसुद्धा आपल्याला म्हणावे लागेल की, नेसफिल्ड यांनी कारणाच्या जागी कार्य आणण्याची चूक केलेली आहे. जात हा एक स्वयंबंदिस्त असा घटक असल्या-कारणाने स्वाभाविकच तिच्या अंतर्गत सदस्यांच्या सहयोजनाही सवयीवर मर्यादा पडतात. परिणामतः जातबाह्य सहयोजनाचा अभाव हा प्रतिबंधामुळे असत नाही तर तो जातींचा स्वाभाविक परिणाम आहे. जातबाह्य खानपानावरील (रोटीबंदी) प्रतिबंध हा भिन्नतेमुळे नसून त्याला धार्मिकतेचे तत्व जोडलेले आहे. परंतु हे तत्व नंतर जोडण्यात आले. सर एच. रिसले हे विशेष लक्ष देण्यासारखा असा कोणताही नवा मुद्दा मांडत नाही.

आता आपण ज्यांनी या विषयावर खूप कार्य केले आहे त्या डॉ. केतकरांच्या व्याख्येचे विश्लेषण करू. केवळ ते भारतातील रहिवासी आहे असे नव्हे तर त्यांचे जातीविषयक विचार गहन अध्ययनातून व चिकित्सक दृष्टीकोन आणि बुद्धीकौशल्याचा वापर करून निर्माण झाले आहे. त्यांची व्याख्या विचारात घेण्याच्या योग्यतेची आहे कारण जातीचे विश्लेषण त्यांनी जातीव्यवस्थेशी असलेल्या तिच्या संबंधातून केलेले आहे. त्यांनी अनावश्यक बाबींना वगळले आहे. त्यांच्या वैचारिकतेतील किंचित गोंधळ सोडला तर त्यांचे विचार सुबोध आणि स्पष्ट

असेच आहेत. जातीचे दोन स्वभाववैशिष्ट्ये म्हणून ते रोटीबंदी आणि बेटीबंदीबद्दल बोलतात. माझ्या मते दोनही बाबी एकच आहेत. आंतरसंबंधाबाबत निषेध तसेच आंतरविवाहालासुद्धा प्रतिबंध करणे ह्या दोनही बाबी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

जातीच्या विविध स्वभाववैशिष्ट्यांच्या चिकित्सक मूल्यमापनातून या गोष्टीबद्दल संशय निर्माण होत नाही की, आंतरविवाहाचा अभाव असाच निषेध व सजातीय विवाहाचा नियम हेच जातीचे मूळ आहे. परंतु लोक मानवशास्त्रीय भूमिकेवरून हे नाकारतील कारण जातीची समस्या न उद्‌भवतादेखील सजातीय विवाह हे करता येवू शकतात. समाजात असे संभव आहे की एखादा सजातीय विवाह समर्थक समाज सांस्कृतिकदृष्ट्या वेगळा राहूनसुद्धा वस्ती करू शकतो. याबद्दलचे तर्कपूर्ण उदाहरण भारतीय काळे अमेरिकन (red Indian) व निग्रो (nigro) म्हणविले जाणारे व गोरे लोक इत्यादी सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न समाज अमेरिकेत अस्तित्वात आहेत. परंतु भारतात मात्र परिस्थिती निश्चितच वेगळी आहे. याबद्दल आपण भ्रमित होता कामा नये. आधीच दाखवून दिल्याप्रमाणे भारतातील लोकसमूह हे सजातीय विवाह प्रथेचे पालन करतात. भारतातील अनेक प्रजाती ह्या काही निश्चित प्रदेशात निवास करतात व त्यांच्यात अंतर्गत देवाण-घेवाणात सांस्कृतिक एकता आहे, जो सजातीय समाजाचा मापदंड आहे. अशा सजातीय विवाह समर्थक प्रथा असलेल्या लोकांत आणि जाती असलेल्या लोकांत निश्चितच भिन्नता आहे. भारतातील जातीप्रथेचा अर्थ आहे समाजाला कृत्रिमरीत्या विभाजित करणे, जे वैवाहिक रिती-संबंधाने एकमेकांपासून वेगवेगळे असले पाहिजेत. अशा प्रकारे हा निष्कर्ष अटळ आहे की सजातीय विवाह हा कशा प्रकारे टिकविला गेला हे दाखविण्यात जर आपण यशस्वी झालो तर आपण जातींची उत्पत्ती आणि जडणघडण हे सुद्धा वस्तूतः सिद्ध केलेले असेल.

सजातीय विवाह हे जातीव्यवस्थेचे मूळ का आहे, असे मी मानतो, याची खात्री तुम्हास आता झालेली असेल. तुम्हास अधिक पेचात न पाडता या विषयावर मी अधिक प्रकाश पाडू इच्छितो. भारत वगळता आज जगातील कुठलाही देश या आदिम मान्यतांना चिकटून राहिलेला नाही. भारतीयांचा धर्म मूलतः आदिम काळातील आहे आणि त्यांचे आदिम संकेत आजसुद्धा आधुनिक काळात मोठ्या जोमाने भारतीय समाज पाळत आहे. यासंबंधात मी हे सांगू इच्छितो की, बर्हिगोत्र विवाहाचे प्रचलन भारतीय समाजात पूर्वीपासून अस्तित्वात आहे, हे सर्वांनाच माहित आहे. काळाच्या प्रवाहात या प्रथेचे महत्त्व कमी कमी होत गेले आणि जवळचे रक्तसंबंधी वगळता त्यासंबंधात विवाहात प्रतिबंध राहिलेला नाही. जरी भारतातील कबीले प्रथा नष्ट झाली असली तरी भारतात आजही बहिगोत्र विवाह

प्रथेचे अस्तित्व विद्यमान आहे. भारतीय विवाह पद्धती, जी गोत्रबाह्य विवाहावर आधारित आहे याचे प्रमाण आहे. भारतात केवळ संपिड (रक्त-आप्त) मध्येच विवाह होऊ शकत नाही तर सगोत्रां (एकाच वर्गाच्या) मधील विवाह सुद्धा निषिद्ध मानण्यात येतो.

म्हणूनच भारतीय जनतेला सजातीय विवाहाचा प्रकार हा परका आहे, ही एक महत्वपूर्ण गोष्ट आपणास लक्षात ठेवायची आहे. भारतात नानाविध गोत्रे आहेत आणि हे गोत्रबाह्य विवाहाला अवलंब करतात. या प्रकारचे इतर वर्गसुद्धा आहेत, जे कुलदेवतांना मानतात. भारतीय जनतेत गोत्रबाह्य विवाह करणे हे एक विधान आहे आणि याचे उल्लंघन होणे शक्य नाही असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. एवढेच नाही तर सजातीय विवाह प्रथा प्रचलित असतानासुद्धा गोत्रबाह्य विवाह पद्धतीचे सक्तीने पालन करण्यात येते. गोत्रबाह्य विवाहाच्या नियमाचा भंग केलेल्यांना विजातीय विवाह केलेल्यापेक्षा कठोर दंडाचे प्रावधान आहे. आपणास माहित आहे की, गोत्रबाह्य विवाहाचा कायदा बनविल्यास जातीप्रथेचे मूळच नष्ट होऊन जाते कारण की बर्हिगोत्र विवाहाचा अर्थ परस्पर एकत्रीभवन होय. परंतु आपल्यामध्ये जातीप्रथा आहे. जिथपर्यंत भारताचा संबंध आहे, परिणाम हाच निघतो की बर्हिगोत्र विवाहाचा नियम एक विधान असतानादेखील याच्याशीच सजातीय (गटांतर्गत) विवाहाचा नियम जुडलेला आहे. वास्तविक पाहात गोत्रबाह्य विवाह करणाऱ्या समाजाला सजातीय (गटांतर्गत) विवाहाचे पालन करणे सहज शक्य आहे, जे जातीव्यवस्थेचे मूळ आहे आणि जी वस्तूतः मूलभूत समस्या आहे. या नियमामुळेच गोत्रबाह्य विवाहाचे प्रचलन असतानादेखील सजातीय (गटांतर्गत) विवाह हे शक्य होतात. या मुद्द्यावरच विचार करून आपणास जातीच्या निर्मितीच्या रहस्याचा उलगडा होऊ शकतो.

अशा प्रकारे सजातीय (गटांतर्गत) विवाह प्रथेचे गोत्रबाह्य विवाह करण्याच्या रूढीवर मिळविलेला विजय म्हणजे जातींची निर्मिती होय. पण वाटते तेवढे हे प्रकरण सोपे नाही. गोत्रबाह्य समाजाला सजातीय विवाहाचे प्रचलन करण्याकरिता कोणत्या साधनाचा अवलंब करावा लागेल, असा विचार करणारा एखादा काल्पनिक समाज घेऊ या. जर एखादा समुदाय सजातीय विवाह प्रथा न मानणारा असून आंतरजातीय विवाह निषेधाचे उल्लंघन करीत असेल आणि आपल्या समुदायाबाहेर विवाह करीत असेल तर जातीची निर्मिती शक्य नाही. येथे विशेष हे आहे की सजातीय विवाह प्रचलनाच्या अगोदर गोत्रबाह्य विवाहाचे प्रचलन अस्तित्वात आहे. सर्वच समुदायात संमिश्रण घडवून येवून एकजीनसीपणा निर्माण होऊन सजातीय समाज बनण्याची प्रवृत्ती असते. जर ह्या प्रवृत्तीला प्रतिबंध करावयाचे असेल तर हे आवश्यक आहे की ज्या समुदायामध्ये विवाहाचे संबंध होत नाही,

त्यांच्या समावेशदेखील प्रतिबंधित वर्गात करावयास हवा. याकरिता ज्याच्या मर्यादेबाहेर लोक विवाहसंबंध जुळविणार नाही असे एक रिंगण सभोवती आखणे अत्यंत आवश्यक आहे.

तथापि बाहेरच्या समुदायाशी विवाह करण्यास मज्जाव केल्याने अंतर्गत समस्यासुद्धा उद्‌भवतात. या समस्या सोडविणे काही सोपे काम नाही. सामान्यतः सर्व समाजात स्त्री-पुरुषांची संख्या ही समान मानण्यात येते किंबहुना समवयस्क स्त्री पुरुषांची संख्याही समान असते. परंतु समाज त्यांना समान मानित नसतो. परंतु जो समुदाय जातीमध्ये परिवर्तित होत असतो त्याला स्त्री-पुरुषांचा समतोल राखणे सक्तीचे असते. कारण त्याशिवाय सजातीय विवाह पद्धती फार काळ टिकविणे शक्य नसते. दुसऱ्या शब्दात जर सजातीय विवाह पद्धतीचे जतन करावयाचे असेल तर त्यासाठी समाजाअंतर्गत वैवाहिक हक्कांची तरतूद करावी लागेल. अन्यथा ज्यांना शक्य होईल त्या त्या मार्गाने आपापली गरज भागविण्यासाठी समूहाचे सदस्य समुदायाबाहेर विवाहसुद्धा स्थापित करतील. म्हणून समुदायांतर्गत वैवाहिक हक्काची तरतूद करण्यासाठी, त्या समुदायाला स्वतःच एका जातीत परिवर्तित होऊ इच्छिणाऱ्या समूहामधील स्त्री-पुरुषांच्या विवाहयोग्य अशा घटकांमध्ये संख्यात्मक समतोल राखणे हे अत्यंत आवश्यक ठरते. केवळ अशा तऱ्हेचा समतोल राखण्यातूनच समूहाला आवश्यक असणारी सजातीय विवाहाची पद्धत टिकवून ठेवता येईल आणि अवाढव्य तफावत ही निश्चितच तिला मोडीत काढील.

तेव्हा जातीच्या निर्मितीकरीता विवाहयोग्य स्त्री-पुरुषातील असमानता दूर करणे परमावश्यक आहे. नैसर्गिकरीत्या हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा एकाच वेळी पती-पत्नी मृत्यू पावतील. केवळ असे घडल्यानेच हे संतुलन शक्य आहे. परंतु ही क्वचित घडणारी अशी आकस्मिक घटना होय. अर्थात असे होणे अशक्य आहे. वास्तविक पाहता पतीच्या मरण्याने पत्नी शिल्लक राहते तर पत्नीच्या मरण्याने पती शिल्लक राहतो. अशा शिल्लक राहिलेल्या स्त्री-पुरुषांची व्यवस्थाही करावीच लागेल. अन्यथा असे शक्य आहे की शिल्लक राहिलेला पुरुष किंवा स्त्री त्या जातीबाहेरच्या व्यक्तीशी विवाह करेल ज्यामुळे जातीच्या निर्मितीचा मूळ तत्वालाच धोका संभवेल. जर या अतिरिक्त स्त्री-पुरुषांना स्वतंत्र राहू दिले व यांच्या विवाहाची कुठलीही व्यवस्था करण्यात आली नाही तर ते अतिरिक्त स्त्री-पुरुष समाजात शिल्लक राहतील. परिणामतः असे सहज शक्य आहे की, समुदायाची मर्यादा ओलांडून हे लोक बाहेरच्या लोकांशी विवाहसंबंध प्रस्थापित करतील व त्या समुदायात विजातीय लोकांना सामावून घेतील.

आता आपणास हे बघावयाचे आहे की जाती निर्मितीला उत्सुक एखादा समुदाय या अतिरिक्त स्त्री-पुरुषांची व्यवस्था कशाप्रकारची करतो. प्रथम आपण

विधवा स्त्रीयांचा विचार करू. सजातीय प्रथा टिकविण्याकरिता या विधवांची दोन प्रकारे व्यवस्था केली जाऊ शकते.

**प्रथम** : या विधवांना त्यांच्या मृत पतीच्या चीतेबरोबर जाळून टाकावे लागेल व या समस्येपासून सुटकारा करून घ्यावा लागेल. स्त्री-पुरुषातील असमानता दूर करणारा हा उपाय अव्यावहारिक आहे. काही प्रमाणात हा उपाय शक्य आहे तर काही प्रमाणात हा उपाय अशक्यदेखील आहे. परिणामतः सर्वच विधवा स्त्रीयांची व्यवस्था करणे हे अशक्य होऊन बसते. वरवर पाहता हा एक सोपा प्रकार आहे पण अतिशय अव्यवहार्य आहे. यास्तव जर अतिरिक्त स्त्रीची (विधवा) व्यवस्था केली गेली नाही व ती जर समाजात शिल्लक राहते तर तिच्या जिवंत राहण्याने समाजाला दुहेरी धोका संभवतो. एकतर ती समाजाच्या बाहेर विवाह तरी करील किंवा आपल्याच समाजातील वधूकरिता आरक्षित असलेल्या पुरुषाबरोबर विवाह करून विवाहयोग्य मुलीची संधी बळकावून बसेल. अशा प्रकारे हा दुहेरी धोका संभवतो. जर तिला तिच्या मृत पतिसोबत जळू द्यावयाची नसेल तर तिची काहीतरी व्यवस्था केलीच पाहिजे.

**दुसरा** : उपाय म्हणजे तिच्या उर्वरित आयुष्यावर कायमचे वैधव्य (विधवापण) लादणे हे होय. व्यवहार्य परिणामांच्या दृष्टीने पाहता तिला जाळून मारण्यापेक्षा तिच्यावर कायमचे विधवापण लादणे सरस उपाय आहे. विधवेला जाळून टाकल्याने तीनही संकटापासून सुटका होऊ शकते. तिच्या मरण्याने कुठलीही समस्या उभी राहत नाही. एक तर ती जातीबाहेर किंवा जातीअंतर्गत विवाह करू शकणार नाही. परंतु तिला जिवंतपणी जाळून मारण्यापेक्षा आयुष्यभर विधवा होऊन राहू देणे हा अधिक व्यवहार्य उपाय आहे. पुनर्विवाहाला अटकाव करणारा हा अधिक सरस असा उपाय आहे परंतु या उपायाने त्या समाजाची नीतिमत्ता टिकून राहू शकत नाही. यात कुठलीही शंका नाही की, सक्तीचे विधवापण लादल्याने स्त्री जिवंत राहते परंतु संपूर्ण जीवन तिला कुणाही पुरुषाची पत्नी बनून राहता येत नाही. त्यामुळे अनैतिकतेला चालना मिळू शकते. परंतु ही काही खूप मोठी अडचण नाही. तिच्यातील आकर्षितपणा कमी करण्याइतपत तिच्यावर विधवापण लादता येवू शकते.

स्वतःपुरती एक जात बनण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या समूहातील अतिरिक्त पुरुषाची (विधूर) समस्या ही अतिरिक्त स्त्रीच्या समस्येपेक्षा कितीतरी अधिक महत्त्वाची आणि कितीतरी अधिक अवघड आहे. ऐतिहासिक काळापासूनच स्त्रीयांच्या तुलनेत पुरुषाला अधिक महत्व प्राप्त होत आलेले आहे. जवळपास सर्वच समाजात पुरुषांचे वर्चस्व राहिलेले आहे. पुरुषाला अधिक प्रतिष्ठा प्राप्त होत आलेली आहे. परंपरागत श्रेष्ठत्वामुळे स्त्रीच्या तुलनेत पुरुषांच्या इच्छांना

अधिक मान प्राप्त होत आलेला आहे. दुसरीकडे स्त्री नेहमीच धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक विषमतेला बळी पडत आलेली आहे. अशा परिस्थितीत विधवा स्त्रीयांशी ज्याप्रकारचे वर्तन केले जाते त्याचप्रकारे वर्तन मात्र विधूर पुरुषांशी केले जात नाही.

विधूराला त्याच्या पत्नीसोबत दहन करण्याचा प्रकार हा दोन प्रकारे विघातक आहे. सगळ्यात पहिले म्हणजे असे करताच येणार नाही. निव्वळ याच कारणांमुळे की तो पुरुष आहे. दुसरा जर असे केले तर समाज एका धष्टपुष्ट जीवाला मुकेल. या विधूर पुरुषाची व्यवस्था लावण्याकरिता समाजाजवळ दोनच उपाय आहेत. तेही व्यवस्थितपणे कारण की तो समाजासाठी उपयुक्त आहे.

पुरुष हा समाजाला कितीही महत्त्वपूर्ण असो पण सजातीय विवाह हे त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे आहेत आणि म्हणूनच समस्याचे निवारण अशाप्रकारे व्हायला पाहिजे की दोनही ध्येये साध्य व्हायला हवेत. अशा परिस्थितीत त्यालासुद्धा विधवेप्रमाणेच आजीवन विधूर बनून राहण्याची सक्ती करण्यात यावी किंवा याप्रकारे जीवन जगण्यास त्याला सांगण्यात यावे. असला उपाय सुचविणे अजिबात अशक्य नाही. आता संयमाच्या मार्गाचा अवलंब करून देखील जीवन जगता येते किंबहूना ब्रह्मचर्य व्रताचे पालन करूनसुद्धा जीवन जगता येते परंतु मानवी स्वभावाला पाहता सहज शक्य होणारी ही बाब नव्हे. दुसऱ्या स्थितीत हे संभव आहे की असा विधूर पुरुष व्यक्ती जर सामाजिक कार्यात भाग घेत असेल तर तो समाजाच्या नैतिकतेला धोका पोहोचवू शकतो.

दुसऱ्या दृष्टीकोनातून बघता ब्रह्मचर्य व्रत इतर बाबीमध्ये सोपे असेल तिथे ते यशस्वी होऊ शकते. परंतु समाजाची भौतिक समृद्धी बघता ही बाब समाजाच्या हितावह नाही. जर असा विधूर पुरुष खऱ्या अर्थाने ब्रह्मचर्य व्रताचे पालन करीत असेल आणि सांसरिक सुखाचा त्याग करीत असेल तर तो समाजाच्या नैतिक मूल्यांना आणि सजातीय विवाहाला धोका पोहोचवू शकत नाही. जेथपर्यंत भौतिक सुखसमृद्धीचा प्रश्न आहे, ब्रह्मचर्य पालन करणारा व्यक्ती हा जाळून नष्ट केलेल्या व्यक्तीसमान मृतवत् आहे. समाजाचे जीवन सुरळीत चालण्याकरिता जातीच्या सदस्यांची निर्धारित प्रमाणात संख्या असणे आवश्यक आहे.

विधूर पुरुषांवर ब्रह्मचर्य लादणे सैद्धान्तिक आणि व्यवहारिक दृष्टीकोनातून निरूपयोगी ठरते. प्रश्न केवळ हाच आहे की त्याच्या जातीतून त्याला एखादी स्त्री प्राप्त करून देणे.

सुखप्राप्तीला यामध्ये अडचण येवू शकते. कारण की जातीय स्त्री आणि पुरुषांचे प्रमाण हे समान असते आणि कुणालाही विवाहाच्या दोन संधी असत नाही. कारण की स्वतःला बंदिस्त करू पाहणाऱ्या जातीत स्त्री पुरुषांचे प्रमाण

निश्चितच संतुलित असते. अशा परिस्थितीत या अतिरिक्त विधूर पुरुषाला जर जातीत सामावून घ्यावयाचे असेल तर अद्याप विवाहयोग्य वय न झालेल्या बालिकेशी त्याचा विवाह लावणेच योग्य ठरते. विधूरांकरिता हाच यथासंभव खात्रीचा उपाय आहे. अशा प्रकारे तो जातीत समाविष्ट होवू शकतो. त्याप्रमाणे त्याला जातीबाहेर करण्यापेक्षा आणि त्याच्या होणाऱ्या संख्येतील कमी रोखण्याकरिता आणि सजातीय समाजामध्ये नैतिकता टिकवून राहण्यापेक्षा वरील उपाय हाच खात्रीचा उपाय आहे.

**स्त्री पुरुषांतील संख्येचे संतुलन खालील चार उपायाने करता येते.**

**१. विधवेचे तिच्या मृत पतीबरोबर दहन करणे.**

**२. विधवेवर सक्तीचे आजीवन वैधव्य लादणे – जीवंतपणी जाळण्यापेक्षा हा उपाय अधिक सौम्य आहे.**

**३. विधूरावर ब्रह्मचर्य लादणे**

**४. अद्याप विवाहयोग्य वय न झालेल्या अल्पवयीन मुलीशी विधुराचे लग्न लावणे.**

माझ्या मते विधवेचे दहन करणे आणि विधुरावर ब्रह्मचर्य लादणे ही सजातीय विवाहपद्धती जतन करणाऱ्या समाजाला संकटासमान आहेत. परंतु जेव्हा साधनांना शक्ती प्रदान करून स्वतंत्रता देण्यात येते, त्यांनी गतिमानता प्राप्त करून देण्यात येते तेव्हा अशी साधने ही साध्य बनतात. अशी साधने कोणते लक्ष्य साध करतात. ही साधने सजातीय विवाहांना टिकवून ठेवतात. तेव्हा वेगवेगळ्या व्याख्याचे विश्लेषण केल्यानंतर सजातीय विवाह आणि जात ह्या एकच बाबी होत. तेव्हा या साधनांचे अस्तित्व आणि जाती ह्या समरूप आहेत. जातीच्या निर्मितीमध्येच या साधनांचा समावेश होतो.

माझ्या मते ही जातीयव्यवस्थेची सर्वसाधारण जडणघडण होय. आता आपण आपले लक्ष या उच्च सिद्धांताकडून वळवून हिंदू समाजात विद्यमान असलेले जाती आणि त्यांच्या जडणघडणीची चौकशी करू. मी निःसंशय हे म्हणू शकतो की जे भूतकाळाची उकल करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या मार्गात अनेक मोठमोठे खाचखळगे असतात आणि भारतातील जात ही खात्रीने एक अत्यंत प्राचीन रूढी आहे. तेव्हा अशा परिस्थितीत जिथे लिखित किंवा निश्चित असा लिखित पुरावा नसताना आणि जेथे हिंदूचा असा दृष्टिकोन बनलेला आहे की ते त्यांच्या मते इतिहासाचे लेखन हा मुर्खपणा आहे. कारण हिंदूकरिता जग हे माया आहे. परंतु जातीसारख्या संस्था जेथे टिकून असतात व जिथे चिरकाळपर्यंत अशा संस्थेचे लिखित प्रमाण उपलब्ध नसते अशा परिस्थितीत अशा संस्थांचे रितीरिवाज आणि नैतिक मूल्ये हीच अवशेषांप्रमाणे इतिहासरूपाने शिल्लक राहतात. आपण आपल्या

कार्यात तेव्हाच सफल होवू जेव्हा आपण हे सांगू शकू की हिंदू समाजाद्वारा या अतिरिक्त स्त्री व पुरुषांची व्यवस्था कशाप्रकारे लावली.

वरवर बघणाऱ्या व्यक्तीला हिंदू समाजाची कार्यपद्धती ही गुंतागुंतीची वाटेल. जातींच्या निर्मितीकरिता हिंदू समाज हा स्त्रियांशी संबंधित तीन असाधारण रूढी किंवा परंपर आपल्यापुढे ठेवतो.

१. **सती किंवा विधवेला तिच्या मृत पतीबरोबर दहण करणे.**
२. **विधवेवर लादण्यात आलेले कायमचे वैधव्य, ज्याअंतर्गत एका विधवेला पुन्हा विवाह करण्याची परवानगी नाही.**
३. **बालिका विवाह**

मानसिक कारणांमुळे संभव असलेली **शारीरिक लिप्सा** ही विधूरांमध्ये संन्यासानंतरही जागृत राहू शकते.

तेवढे मला माहित आहे, आजपर्यंत या प्रथांच्या उद्‍भवासंबंधी कोणतीही वैज्ञानिक व्याख्या पुढे आलेली नाही. अनेक दार्शनिक सिद्धांत या प्रथेच्या समर्थनार्थ मांडण्यात आलेले आहेत. परंतु कुठुनही या प्रथांच्या उद्‍भव आणि अस्तित्वाविषयी संकेत मिळू शकला नाही.

सतीप्रथेचे समर्थन करण्यात येते. (A. K. Kumarswamy : Sati A Defence of the eastern women in the sociological review vol-IV-1913)

कारण की, सती जाणे हे पती पत्नीमधील शारीरिक आणि आत्मिक परिपूर्णतेचे व एकरूपतेचे आणि मृत्यूनंतरचे साकार रूप आहे. सती जाणे म्हणजे मृत्यूच्या सीमा ओलांडणारी भक्ती होय व याला योग्य पद्धतीने उत्तमपणे पार्वतीकडून गौरविले गेले आहे. सती जाणे हाच स्त्रीचा गौरव होय, तोच तिचा शाश्वत स्वर्ग आहे आणि ती अत्यंत हृदयभेदक भक्तीभावनेने म्हणते, 'हे महेश्वरा, जर तुला माझ्यापासून सुखप्राप्ती होत नसेल तर मला स्वर्गही नकोसा होईल.' सक्तीच्या वैधव्याचा उदोउदो का करण्यात येतो हे मला माहीत नाही. याचे समर्थन करणारा व्यक्ती अद्यापही मला भेटला नाही. परंतु याचे समर्थक मात्र अनेक आहेत. बालविवाहाच्या समर्थनार्थ डॉ. केतकर म्हणतात, 'एका खऱ्या व्रतस्थ स्त्री अथवा पुरुषाने ती ज्या कुणाशीही विवाहबद्ध झालेली आहे, विवाहानंतर इतर पुरुष अथवा स्त्रीशी आस्था ठेवता कामा नये. अशाप्रकारची भावना ही केवळ विवाहानंतरच आवश्यक आहे. असे नव्हे तर ती विवाहापूर्वीसुद्धा आवश्यक आहे. कारण तोच तिचा एकमेव असा निष्कलंकतेचा उचित आदर्श होय. ज्याच्याशी ती विवाहबद्ध होणार आहे त्याच्या व्यतिरिक्त अन्य पुरुषांबद्दल प्रेम बाळगणाऱ्या कुमारिकेला शुद्ध मानण्यात येणार नाही. तिचा विवाह कुणाशी होणार आहे, हे तिला माहित

नसल्यामुळे विवाहापूर्वी तिच्यात कुठल्याही परपुरुषाबद्दल प्रेम निर्माण होता कामा नये. जर तिला तसे वाटले तर ते पाप होय. म्हणून एखाद्या मुलीला तिच्यात कोणतीही लैगिक जाणिव जागृत होण्यापूर्वी तिला कुणाशी प्रेम करायचे आहे हे माहित असणे उचित होय.'

म्हणूनच सतीप्रथेचे समर्थनार्थ अशा प्रकारचा विचित्र आणि मुर्खतापूर्ण तर्क लावून समर्थन करण्यात येते. परंतु या प्रथेचे प्रचलन समाजात केव्हा रूढ झाले. याचे ज्ञान मात्र या तर्कांनी होवू शकत नाही. माझा असा विश्वास आहे की, त्या समाजाद्वारा स्वीकारण्यात आल्यानेच प्रचलित झाल्या ज्याला कुणालाही १८ व्या शतकातील व्यक्तीवादाचे ज्ञान आहे, त्याला माझ्या म्हणण्यातील अर्थ कळेल. सर्व कालखंडामध्ये चळवळींना महत्त्व प्राप्त होत राहिलेले आहे. यानंतरच तिचे समर्थन करणारे तिला वाढवितात. म्हणून मी आग्रहाने प्रतिपादन करतो की, इतका उदोउदो करून प्रशंसीत केलेल्या प्रथा सिद्ध करतात की, त्याच्या प्रचलनास्तव त्यांना अत्यंत प्रशंसनेची गरज होती. आता याचा प्रसार कसा करता येईल, या कारणास्तव या प्रथांच्या प्रचारार्थ तत्वज्ञाने निर्माण केली गेली.

आपणास माहितच आहे की या प्रथा किती क्रूर, वाईट आणि घातक आहेत. प्रथा ह्या साधनमात्र आहेत. परंतु याला 'साध्य' म्हणून घोषित करण्यात आले. परंतु यांच्या परिणामांपासून मात्र आपण भ्रमित होता कामा नये. साधनांना 'आदर्श' म्हणून घोषित केल्यानंतरच यांना मोठ्या समर्थनासह प्रचलित करण्यात येते. साधनांना साध्य मानून घेतल्याने त्याचे खरे स्वभाववैशिष्ट्य लपवून ठेवता येत नाही. साधनांना साध्य मानणारा कायदा बनवून आपण मानू शकता की सर्व मांजरे ही कुत्रे आहेत, हे सिद्ध करू शकत नाहीत. अर्थात अशा प्रकारे आपण साधनांना साध्य म्हणून मानू शकतो तेव्हा साधनांना साध्य मानले तरी सती प्रथा, लादलेले वैधव्य आणि बालिका विवाह ह्या प्राथमिकरीत्या जातीतील अतिरिक्त पुरुष आणि अतिरिक्त स्त्री यांची समस्या सोडविण्याच्या आणि सजातीय विवाहपद्धती जोपासण्याच्या उद्देशाने उपयोजिलेल्या प्रथा होत. ह्या प्रथा वाचून काटेकोर सजातीय विवाहपद्धती जोपासली जाणार नाही. तद्वतच सजातीय विवाहपद्धतीही यावाचून अस्तित्वात येणे संशयास्पद ठरते.

भारतातील जातीच्या निर्मितीची आणि जडणघडणाच्या विकासाची अवस्था स्पष्ट केल्यानंतर पुढला प्रश्न हा स्वाभाविकरीत्याच तिच्या उत्पत्तीबद्दल शिल्लक राहतो. उद्‌भवाचा प्रश्न हा नेहमीच एक गूढ प्रश्न असतो आणि जातीच्या अभ्यासातून जाणीवपूर्वक दुर्लक्षिला जातो. काहींनी त्याच्याकडे दुर्लक्ष केलेले असते तर काहींनी त्याच्यापासून अंग चोरलेले असते. जातीचा उगम हा कोड्यात टाकण्यासारखा प्रश्न असू शकतो का? याविषयी काहीजण गोंधळात पडलेले

असतात आणि ते सुचवितात की, जर आपण आपली उत्कंठा 'जातीचे उगमस्थान' म्हणण्यापर्यंत नियंत्रित ठेवू शकत नसलो तर त्याचे अनेकवचनी रूप वापरावे जसे 'जातीची उगमस्थाने' माझ्यापुरते म्हणाल तर भारतातील जातीच्या उगमामुळे मला बुचकळ्यात पडल्यासारखे वाटत नाही. कारण या आधीच मी आपली विचारसरणी मांडलेली आहे की 'सजातीय विवाहपद्धती' हेच जातीचे एकमेव वैशिष्ट्य आहे आणि जेव्हा मी जातीचा उगम असे म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ असतो सजातीय विवाहपद्धतीच्या तंत्राची जडणघडण.

एखाद्या समाजात वरील धारणेला इतक्या सुक्ष्मपणे इतक्या प्रचंड शक्तीन प्रसारित करणे म्हणजेच समाजात घाण पसरविण्यासारखेच आहे. एकप्रकारे राजकीय भाष्यामध्ये म्हणायचे असल्यास समाजाला भूल देण्यासारखेच आहे. वर्गसंघर्षाचा सिद्धांत प्रतिपादन करणे ही एक अस्तित्वात असलेली वस्तुस्थिती होय. त्याचा आधार वेगवेगळा असेल. ते आधार आर्थिक किंवा बौद्धिक अथवा सामाजिक असतील. परंतु समाजातील व्यक्ती ही नेहमी वर्गाची सदस्य असते. हे एक सार्वत्रिक सत्य आहे आणि प्रारंभीचा हिंदू समाज हा या नियमाला अपवाद असू शकत नव्हता आणि वास्तविक पाहता तो तसा नव्हता हे आपण जाणतो. आपण हे सामान्य विधान मनात बाळगल्यास आपल्या जातीच्या उत्पत्तीचा सिद्धांत ठरविणे हे अतिशय सुसाध्य होईल. कारण आपणास फक्त हेच निश्चित करावयाचे आहे की तो कोणता वर्ग होता जो सर्वप्रथम स्वतःच एक जात बनला. तसे म्हटल्या वर्ग आणि जात हे एक दुसऱ्यास फारच जवळचे आहेत. फक्त फरक इतकाच आहे की जात हा एक 'बंदिस्त' वर्ग होय.

जातीच्या उगमाच्या मूळाचा शोध घेतल्यास आपणास या प्रश्नाचे उत्तर मिळते की, तो कोणता वर्ग होता ज्याने स्वतःलाच एका बंदिस्त वर्गात कोंडून घेतले? हे एक प्रकारचे चक्रव्यूहच आहे. हा प्रश्न अतिशय चौकसपणाचा असून समर्पक आहे आणि याचे उत्तरही भारतभरच्या जातीच्या फैलावाच्या आणि विकासाच्या रहस्याचे स्पष्टीकरण आपणास पुरवील. दुर्दैवाने या प्रश्नाचे सरळ उत्तर मी देऊ शकत नाही. मी त्याचे उत्तर अप्रत्यक्षपणे देऊ शकेन. मी आत्ताच सांगितले आहे की, वरील प्रथा ह्या हिंदू समाजात प्रचलित होत्या. तर्काशी प्रामाणिक राहण्यासाठी हे आवश्यक आहे की या तर्काचे स्पष्टीकरण केले जावे जेणेकरून यांची व्यापकता स्पष्ट केली जाईल. ह्या प्रथा त्यांच्या **'ब्राह्मण'** नामक एकाच जातीत मिळण्यासारख्या आहेत आणि ब्राह्मणोत्तरात यांचे प्रचलनात यांचे प्रचलनात ना कठोरपणा आहे ना संपूर्णतः ही महत्त्वपूर्ण वस्तुस्थिती एक महत्त्वपूर्ण निरीक्षणाचा पाया म्हणून उपयोगी पडते.

जर ब्राह्मणेत्तर जातीमधील ह्या प्रथांचा फैलाव जर अनुसरणात्मक असेल

तर अगदी सहजपणे दाखविता येईल की 'जात' ह्या रूढीचा जनक कोणता वर्ग आहे, वस्तुतः हे सिद्ध करावयास कुठल्याही युक्तीवादाची गरज नाही. ब्राह्मणवर्गाने स्वतःला एका जातीमध्ये बंदिस्त केले असावे हा एक वेगळा प्रश्न आहे, ज्यावर आपणास नंतर विचार करावयाचा आहे.

पण ह्या प्रथांचे काटेकोरपणे पालन आणि सगळ्याच पुरातन संस्कृतीमधील पुरोहित वर्गाचे सामाजिक वर्चस्व पाहता कृत्रिम साधनाद्वारे कृत्रिमरीत्या जोपासल्या गेलेल्या जातीच्या 'अस्वाभाविक रूढीचे' जन्मदाते 'ब्राह्मण' लोक हेच होय.

आता मी अखंड भारतभर पसरलेल्या जातिव्यवस्थेची वाढ आणि प्रसार यांच्या प्रश्नासंबंधी माझ्या निबंधाच्या तिसऱ्या भागाकडे येतो. मला ज्या प्रश्नांचे उत्तर द्यावयाचे आहे तो असा की देशातील उर्वरित अशा ब्राह्मणेतर लोकसमुदायात जातीची रूढी कशी पसरली? संपूर्ण भारतातील जातीच्या प्रसाराच्या प्रश्नाला उत्पत्तीच्या प्रश्नापेक्षाही अत्यंत खडतर प्रसंगातून जावे लागलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे यांचा विस्तार आणि उगम ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी नाहीत. विद्वानांमध्ये या बाबतीत एकमत आहे की जातीप्रथेला नैतिकतेचे आवरण चढवून साध्याभोळ्या भारतीय जनतेवर एकतर थोपविण्यात आले किंवा सामाजिक विकासाच्या अवस्थेतून जात असलेल्या भारतीय समाजावर कायद्याद्वारे लादण्यात तरी आली असावी.

प्रथमतः मी भारताला संहिता (विधान) किंवा कायदा प्रदान करणाऱ्याचा समाचार घेवू इच्छितो. प्रत्येक देशात विधी-निर्माता असतो जो संकटसमयी पापी समाजाला मानवतेच्या मार्गावर आणण्यासाठी आणि तिला न्यायाची आणि नीतिमत्तेची संहिता देण्यासाठी 'अवतार' म्हणून उभा राहतो. भारताचा विधिनिर्माता, 'मनू' हा जर कधीकाळी अस्तित्वात होता असे म्हटल्यास खात्रीने तो एक उलट्या काळजाचा मनुष्य होता. त्याने कायद्याची अथवा स्मृतींची रचना केली असेल तर निश्चितच तो एक अधम व्यक्ती होता आणि ज्या समाजाने त्याला स्वीकारले तो समाज आजच्या समाजापेक्षा निश्चितच वेगळा असला पाहिजे. हे अकल्पनीय आहे की जातीचे नियम (संहिता) हे रचण्यात आलेले होते. मनुद्वारे निर्मित कायद्याद्वारे एका वर्गाला रसातळाला पोहोचविण्यात आले आणि दुसरीकडे त्याला छळण्याकरिता त्याच्यावर दुसरा आणखी एक श्रेणीबद्ध वर्ण रचण्यात आला. संबंध समाजाला छळण्याकरीता निर्माण करण्यात आलेले अधम कायदे बनविणारा 'मनू' हा निश्चितच क्रूर व्यक्ती असावा, ज्याने अन्यायाने हे सगळे निर्माण केले. मी मनूविषयी कठोरतेचे बोलत आहे, कारण की मी मनूचा पूर्णपणे समाचार घेवू शकत नाही. तो एखाद्या 'सैतानाप्रमाणे' जिवंत आहे. परंतु तो जास्त काळ जगू शकेल असे मला वाटत नाही. मला एक गोष्ट तुमच्यावर ठसवायची आहे की ती

ही की, मनूने जातीची संहिता निर्मिलेली नव्हती आणि तो तसे करूही शकत नव्हता. मनूच्याही फार आधीपासून जास्त अस्तित्वात होती. ती तिचा मात्र पुरस्कर्ता होता आणि म्हणूनच त्याने तिला तात्विक रूप दिले. तथापि हिंदू समाजाचा वर्तमान क्रम हा निश्चितच त्याने रचलेला नव्हता आणि असे करणेही शक्य नव्हते. त्याचे क्रम हे अस्तित्वात असलेले जातीचे नियम क्रमबद्धरीत्या संग्रहित करण्याइतपत आणि जातीधर्माचा उपदेश करण्यापुरताच तो संबंधित होता. जातीव्यवस्थेचा प्रसार आणि फैलाव ही कामगिरी इतकी अवाढव्य आहे की ती बळाद्वारे वा व्यक्तीच्या धूर्तपणामुळे किंवा एखाद्या वर्गाच्या द्वारे साध्य करता येणार नाही. माझ्या तर्कांना बळ देताना मी हा सिद्धांत मांडतो की 'ब्राह्मण' वर्गानेच जातीची निर्मिती केली. मी मनूविषयी इतकेच म्हणू इच्छितो की वैचारिक दृष्टीकोनातून असे करणे हे निश्चित चुकीचे आणि हेतूने 'मत्सरपूर्वक' करण्यात आलेले आहे. अनेक गोष्टींबद्दल ब्राह्मण हे दोषी असतील आणि ते तसे होतेही, असेही मी म्हणण्याचे धाडस करतो. तथापि ब्राह्मणेत्तर समाजावर जातीव्यवस्था लादणे हे त्यांच्या धाडसापलीकडे कार्य होते. आपल्या आवाक्याबाहेरील बाब असताना देखील आपल्या पद्धतीने ब्राह्मण वर्गाने ही व्यवस्था अंमलात आणली. आपल्या नियमानुसार संपूर्ण समाज घडविणे कोणी कितीही श्रेष्ठ अथवा गौरवशाली का असेना त्याच्या आवाक्यामधली ही बाब नव्हे. काळाच्या काही मर्यादेपर्यंत तो प्रसंशेस पात्रही ठरेल परंतु अधिक काळ तो ही योजना टिकवून ठेवू शकत नाही. माझी टिका कदाचित आपणास बोचतही असेल परंतु मी आपणास आश्वस्त करू इच्छितो की हे असत्य मात्र नाही. सनातनी हिंदूंच्या मनात असा दृढ विश्वास आहे की हिंदू समाज हा कधीतरी जातीव्यवस्थेच्या चौकटीत घडलेला होता आणि ही बाब शास्त्रांनी निर्माण केलेली आहे. यावर केवळ समाजाचा विश्वासच नाही तर या विश्वासाचे पालनदेखील त्याच्याद्वारे करण्यात येते. या सिद्धांताचे समर्थन या आधारावर करण्यात येते कारण की, यांचा जन्म शास्त्रातून झालेला असून शास्त्रे ही चूकीची असू शकत नाही. मी अद्यापही या सिद्धांताच्या विकृतीवर लक्ष्य केंद्रित केलेले नाही कारण की धार्मिक आधारावर 'जाती' या समाजावर लादण्यात आल्यात. या प्रथांच्या विरूद्ध असलेल्यांच्या बाजूने मी सध्याच उभा राहू इच्छित नाही. कारण की उपदेशाद्वारे जाती ह्या निर्माण झालेल्या नव्हत्या किंबहुना उपदेशाद्वारे या नष्ट होणाऱ्या नाहीत. माझे ध्येय हे धार्मिक मान्यतेला जिने शास्त्रीय आधारावर उच्च पदापर्यंत चढविले त्या प्रवृत्तीतील फोलपणा दाखवून देणे आहे.

अशा प्रकारे व्यक्ती-पूजेचा सिद्धांत भारतामध्ये जातीप्रथेच्या फैलावाकरिता विशेष लाभदायक सिद्ध होवू शकत नाही. पाश्चात्य विद्वानांना संभवतः व्यक्तीपूजेला विशेष महत्त्व न देता त्यांनी दुसऱ्या व्याख्यांना आधार मात्र बनविले आहे. त्यांच्या

मते ज्या मान्यतांमुळे जातींचा जन्म झाला त्या म्हणजे १. व्यवसाय, २. विभिन्न टोळीमय संघटनांचे अस्तित्व, ३. नव्या मतांचा उदय, ४. संकरित (नव्या) जाती आणि ५. स्थलांतर

प्रश्न निर्माण होतो तो हा की या मान्यता तर इतर समाजातही अस्तित्वात आहेत आणि भारतातच ह्या विशिष्ट स्वरूपात अस्तित्वात का आहेत? जर ह्या मान्यता फक्त भारताशीच संबंधित नसतील किंबहुना जगाला समान असतील तर या प्रथांनी जगातील अन्य भागात जातीचे 'रूप' का धारण केले नाही. याचे कारण हे आहे की त्यांची भूमी वेदांच्या या भूमिपेक्षा अधिक पवित्र आहे किंवा विद्वानांची मते ही चूकीची आहेत. माझ्या माहितीप्रमाणे विद्वानांचीच मते चुकीची आहेत. अनेक विद्वानांनी वरीलपैकी कुठल्या ना कुठल्या मान्यतेच्या आधारावर स्वतःच्या विचारधारेचे समर्थन उच्च सिद्धांताचे निकष लावून केलेले आहे. काहीतर असहाय होवून म्हणतात की हे सिद्धांत उदाहरणाच्या शिवाय काहीही नाहीत.

मैथयू अर्नाल्डच्या मते, यांच्या विचारात कुठल्याही प्रकारचा सिद्धांत नसून यांना केवळ मोठे नाव जोडलेले आहे. सर डेन्झील इब्बतसन, मि. नेसफिल्ड, मि. सेनार्ट आणि सर एच. रिस्ले ह्यांनी प्रगत केलेले जातीविषयक हे सिद्धांत हे असे आहेत. या सर्वांवर टिका करताना मी हेच म्हणू शकतो की या सर्वांनी 'री' ओढण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदाहरण द्यावयाचे झाल्यास मि. नेसफिल्ड म्हणतात की भारतातील जातीची निर्मिती ही व्यवसायाच्या आधारावर झालेली आहे. परंतु त्यांच्या ह्या सांगण्यावरून आमच्या माहितीत मात्र कुठलीही भर पडत नाही. त्यांच्या म्हणण्याचा सारांश फक्त एवढाच आहे की 'व्यवसायाच्या' आधारावर जातींची निर्मिती झालेली आहे. आम्हाला नेसफिल्ड साहेबांना हे विचारावयाचे आहे की विभिन्न व्यवसायाच्या आधारावर जातींची निर्मिती कशी झाली? जर नेसफिल्ड साहेबांचा विचार हा अजब (विचित्र) सिद्धांत नसता तर मी वंशशास्त्रज्ञांच्या इतर सिद्धांतावर सहर्षपणे विचार करावयास तयार झालो नसतो. मी या सिद्धांतावरील परीक्षण सुरू ठेवीतच इतर विषयाबद्दलची माझी मते मी आपणापुढे ठेवीन. ज्या सिद्धांताद्वारे जातींच्या विभाजनकारी नियमांचे स्वाभाविकपणे पालन करण्यात येते. जसे की हर्बर्ट स्पेन्सर यांनी आपल्या विकासाच्या सिद्धांतामध्ये व्याख्या केलेली आहे आणि याला 'सजीव' मधील शरीररचनेतील फरका इतकेच स्वाभाविकपणे सांगून जुन्याच विचारांचे समर्थन सुप्रजननशास्त्राच्या नवीन आधारावर केलेले आहे. यावरून त्यांचा सनकी स्वभाव लक्षात येतो की जाती ह्या स्वाभाविकपणे बनलेल्या असून त्या समाजमान्य आहेत आणि समाजाद्वारा त्यांचा स्वीकार स्वाभाविकपणे करण्यात आलेला आहे.

प्रारंभीचा मी हे आपणास सांगितले पाहिजे की पुरातनकालीन हिंदू समाज

हा चार वर्गामध्ये विभाजित झालेला होता. हे वर्ग म्हणजे १. ब्राह्मण किंवा पुरोहित वर्ग, २. क्षत्रिय किंवा सैनिक वर्ग, ३. वैश्य किंवा व्यापारिक वर्ग, ४. शुद्र अथवा श्रमिक वर्ग.

आपणास या गोष्टीकडे विशेषत्वाने लक्ष्य देण्याचे आहे की पुरातन काळात व्यक्ती आपला वर्ग गुणवत्तेच्या आधारावर बदलू शकत असे आणि म्हणून तत्कालीन वर्णपरिवर्तनशीलता समाजमान्य बाब होती. हिंदूंच्या इतिहासात एकेकाळी ब्राह्मण वर्गाने आपले विशिष्ट स्थान निर्माण केले आणि स्वतःला 'बंदिस्त वर्ग' म्हणून घोषित करून जातींची निर्मिती केली. यानुसार दुसरे वर्गसुद्धा श्रमविभाजनाच्या तत्वाला बळी पडून वेगवेगळ्या जातींमध्ये विभागले गेले. काहींचे संख्याबल हे जास्त होते तर काहींचे संख्याबल कमी. यामुळचे वैश्य आणि शुद्र वर्गामध्ये अनेक उपजातींचा समावेश होत गेल्याने त्यांच्यामध्ये वेगवेगळ्या जाती निर्माण झाल्या. सैनिकी पेशातील लोक मात्र सहजासहजी जातीत विभाजित होवू शकत नसल्याने हा वर्ण सैनिक आणि शासकांकरिता राखीव बनला.

वर्णानुसार समाजाचे विभाजन हे स्वाभाविक आहे. परंतु यामध्ये अनावश्यक जर कुठली गोष्ट निर्माण झाली तर ती म्हणजे 'वर्णाची परिवर्तनशीलता कायमची नष्ट होणे' ही होय. हे वर्ण पुढे बंदिस्त वर्ण होवून यांच्यात जातींची निर्मिती झाली. प्रश्न असा निर्माण होतो की इतर वर्ण स्वतःमध्येच बंदिस्त का होत गेले? आणि त्यांनी स्वतःमध्येच सजातीय विवाहाचा नियम का निर्माण केला? त्यांनी हे स्वेच्छेनच का स्वीकारले? माझ्या मते याचे उत्तर दुहेरी आहे. काहींनी दरवाजा बंद केला तर इतरांना तो त्यांच्यासाठी बंद झालेला आढळला. यातील पहिली बाजू ही मानसशास्त्रीय आहे तर दुसरी चालाकीने भरलेली आणि या दोनही बाबी एकमेकांवर अवलंबून आहेत तेव्हा जातींच्या जडणघडणीत दोनही बाबींची व्याख्या होणे आवश्यक आहे.

प्रथम मानसशास्त्रीय व्याख्येपासून सुरू करू या. या संबंधात आपणास या प्रश्नाचे उत्तर शोधावयाचे आहे की व्यावसायिक व धार्मिक किंवा अन्य कारणांनी इतर वर्ग अथवा जातींनी स्वतःला आत्मकेंद्रित करून सजातीय विवाह प्रथेचा स्वीकार का केला? माझे हे मत आहे की ब्राह्मण वर्गाचे हे कृत्य आहे. सजातीय विवाह किंवा आत्मकेंद्रित राहणे हे प्रारंभापासूनच हिंदू समाजाचे लक्षण होते. त्यातल्या त्यात ब्राह्मण वर्गाने प्रारंभापासूनच स्वतःला बंदिस्त वर्ग म्हणून मर्यादित केल्याने ब्राह्मणेतर वर्णानेदेखील याच बाबीचा मोठ्या जोराने स्वीकार केला आणि सजातीय विवाह प्रथेचा स्वीकार केला. 'इतरांनी बदललेले पाहून स्वतःसुद्धा बदलणे' यासारखाच हा प्रकार आहे. या अनुसरणाच्या तत्वाने सर्वच वर्ग आणि जातींना प्रभावित केले. अशा प्रकारे भारतीय समाजात जाती निर्माण झाल्या.

मनुष्यामध्ये नकल करण्याची प्रवृत्ती बहुतेक सुप्त अवस्थेत असतेच. म्हणून जातीच्या संदर्भात याला जोडणे क्रमप्राप्त आहे. नकल करण्याच्या (अनुसरनाच्या) प्रवृत्तीविषयी वाल्टर बेजहोटचे म्हणणे आहे की, 'असा विचार करता कामा नये की नकल करण्याची प्रवृत्ती ही इच्छेने निर्माण होते किंवा यामागे कोणती भावना काम करीत असते' तर याउलट या प्रवृत्तीचा जन्म मानवाच्या मनामध्ये सुप्तपणे होत असतो आणि पूर्ण चेतनावस्थेत आल्यावरच यांच्या प्रभावांचा आभास होतो. म्हणून केवळ यांच्या तत्काळ उद्‌भवांचा प्रश्नच निर्माण होत नाही तर नंतरही यांच्या परिणामाची जाणीव होत नसते. वास्तविक पाहता अनुसरणाच्या प्रवृत्तीवर आपला मूळातच विश्वास असतो तसेच याला काही पूर्वकालीन कारणे जबाबदार असतात, जे आपणास विश्वास ठेवावयास भाग पाडतात अथवा पाडत नाहीत. हा आपल्या प्रवृत्तीतील अस्पष्ट असा भाग आहे. सरळ मनाने अनुसरण करण्याच्या प्रवृत्तीवर मात्र कुणीही संशय घेवू शकत नाही. अनुसरणाच्या (नकल करण्याच्या) प्रवृत्तीच्या विषयावर गॅब्रिएल टार्डद्वारे वैज्ञानिक अध्ययन केले गेले आहे. टार्डने अनुसरणाच्या वृत्तीला तीन नियमात नियमबद्ध केले आहे. त्याच्या तीन नियमांपैकी पहिला नियम हा की–

१. खालचा वर्ग हा नेहमी वरच्या वर्गाचे अनुसरण करीत असतो.

त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर 'संधी मिळताच दरबारी' हे आपल्या सेनापतीचे, राजा आपल्या सम्राटाचे व सर्वसामान्य जनतादेखील आपल्या पुढाऱ्याचेच अनुसरण करीत असते.

अनुसरणाच्या टार्डचा दुसरा नियम हा आहे की–

२. ज्यांचे अनुसरण केले जाते तो आदर्श व अनुसरण करणारे यांमधील अंतर कितीही असले तरी नकल करण्याच्या इच्छेत अथवा प्रवृत्तीत कुठलाही फरक पडत नाही. जरी अंतर खूपच असले तरी आदर्शाच्या संपर्कात येताच ही वृत्ती बळावते. अंतर याचा अर्थ 'समाज विज्ञानाच्या आधारावर' असा करण्यात आला आहे. जर आपला आदर्शाशी संपर्क रोज रोज असेल अथवा त्याच्या अगदी जवळ येत असू व त्यांच्यासारखी वेशभूषा आणि पेहराव वापरण्यास संधी मिळत असेल तर आदर्श हा कितीही उंच स्तरावरील का असेना, कितीही अपरिचित का असेना, आपण स्वतःला त्याच्याजवळचा मानत असतो. आदर्शाच्या सर्वाधिक जवळ जर व्यक्ती असला तर तो निश्चितच अनुसरणशील बनतो. बहुधा वरच्या स्तरावरील लोक हे सहज प्रभाव पाडणारे असतात. खरे पाहता या बाबतीत प्रमाणाची आवश्यकता नाही. परंतु मला माझ्या विचारांच्या समर्थनार्थ असे म्हटलेच पाहिजे की जातींची निर्मिती ही अनुसरणाच्या वृत्ती कितपत आहे. या नियमानुसार अनुसरणाची प्रवृत्तीची संभावना तीन प्रकारे असू शकते.

१. ज्यांचे अनुसरण करावयाचे आहे त्या व्यक्ती समाजातील उच्च दर्जाच्या असाव्यात.

२. त्या समूहातील सदस्यांचे दररोज आणि वारंवार संपर्क व्हायला हवा. भारतीय समाजात ह्या प्रवृत्ती विद्यमान आहेत. यामध्ये कुठल्याही प्रकारचा संशय नाही. ब्राह्मणाला अर्धदेव किंवा भूदेव मानण्यात येते आणि त्याला काही प्रमाणात अंशावतारही मानण्यात येतो. तो समाजाचे नियम बनवितो आणि इतरांना अनुसरायला भाग पाडतो. त्यांच्या या कृत्याबद्दल कुणीही शंका घेवू शकत नाही. कारण ब्राह्मणाने केलेले कोणतेही कार्य हे उत्तम होय. शास्त्रांद्वारा विधीसंमत आणि पुरोहिताद्वारा समर्थित ब्राह्मणासारखा वर्ग हा प्रभावाशाली नसेल का?

जर ते तथ्य सत्य आहे तर 'ब्राह्मण वर्ग हा जातींचा निर्माता वर्ग' होय. जर हे सत्य आहे तर ब्राह्मणांनाच जातीचा निर्माता वर्ग म्हणून का मानण्यात येते? जर तो सजातीय विवाहाचे पालन करीत असेल तर इतरांनीही तसे का करू नये? भोळीभाळी जनता मग तो विद्वान असो किंवा गृहस्थ, त्याला या फंदात पडावेच लागते.

जातीच्या जडणघडणीत अनुसरणाच्या प्रवृत्तीची भूमिका कितपत आहे हे सांगण्याकरिता ब्राह्मणेत्तर वर्गाच्या मनप्रवृत्तीला समजणे आवश्यक आहे, ज्यांकरिता आजही ह्या प्रथा रीतीरिवाजासमान आहेत व ज्यांनी हिंदू मनाला जखडून ठेवलेले आहे. एकप्रकारे हिंदू समाजात सतीप्रथा, बालिका विवाह आणि विधवांचे अस्तित्व हे प्रत्येक जातीच्या स्तरानुसार अस्तित्वात आलेले आहेत. परंतु या प्रथांचे चलन हे वेगवेगळ्या जातीमध्ये असमान रितीने त्या त्या जातींच्या दर्जानुसार आहे. ब्राह्मणेत्तर लोकांच्या जे जवळ आहेत त्यांच्यात केवळ वैधव्य आणि बालिका विवाह प्रचलित आहेत. इतर जाती ज्या जास्त दूर आहेत त्यांच्यात केवळ बालविवाह प्रचलित आहेत आणि सर्वाधिक अंतरावर असलेले लोक हे जातीभेदांचे पालन करतात. मी निःसंकोच हे म्हणू शकतो की, हे अनुसरण हे टार्डच्या नियमाला धरूनच आहे. काही प्रमाणात त्या प्रथा जंगली आहेत. ह्या प्रथा म्हणजेच टार्डेच्या नियमाची उदाहरणे होत. या ठिकाणी मी माझ्याच मताची पुनरावृत्ती करताना म्हणेन की, उपरोक्त तीनही प्रथांच्या आधारावर ब्राह्मणांनी जातीची निर्मिती केली. या विचारांच्या मागे माझा हाच तर्क आहे की ब्राह्मण वर्गापासूनच इतर वर्गात ह्या प्रथा रूढ झाल्यात. ब्राह्मणवर्गाच्या प्रवृत्तीचे ब्राह्मणेत्तरांकडून अनुसरण करण्याच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकताना मी म्हणेन की जरी ह्या प्रवृत्ती सवयीनुसार त्यांच्यात अस्तित्वात नसल्या तरी या प्रवृत्ती ब्राह्मणेत्तर वर्गात आजही अस्तित्वात आहेत.

जर ब्राह्मणेत्तर वर्ग हा दुसऱ्या कोणाही वर्गापासून ह्या सवयी शिकलेला आहे तर नक्कीच या प्रथा वरच्या वर्गात प्रचलित असल्या पाहिजेत, तेव्हाच त्या खालच्या वर्गाच्या आदर्श बनू शकल्या.

कुठल्याही ईश्वरवादी समाजात कुठलाही आदर्श राहू शकत नाही. केवळ ईश्वराचा सेवक म्हणजेच पुरोहित किंवा ब्राह्मण हाच आदर्श असू शकतो. या ठिकाणी अशा लोकांची कहाणी संपते की जे लोक दुर्बळ होते व ज्यांनी स्वतःलाच वेगळे करून घेतले. आता आपणास हे पहावयाचे आहे की, दुसऱ्या लोकांनी इतरांना त्यांचे दरवाजे बंद असलेले पाहून स्वतःला बंदिस्त कसे करून घेतले? याला मी जातींच्या जडणघडणातीच्या कार्यातील एक प्रक्रिया म्हणतो. हे एक चालाकीने भरलेले कृत्य होते आणि असे करणेदेखील आवश्यक होते. याचा दृष्टीकोण आणि मानसिकतेमुळे आपणापूर्वी इतरांनी या विषयाची व्याख्या करण्याचे टाळले कारण की त्यांनी 'जाती'लाच एक स्वतंत्र अंग मानले. जेव्हा की वरील कृत्य हा जातीचाच भाग आहे. ही चूक किंवा सुक्ष्म दृष्टीकोणाच्या अभावामुळे हा विषय जसाच्या तसा समजून घेण्यात आणि स्पष्टीकरण करण्याची कठीण होवून बसलेला आहे. म्हणून जातींची व्यवस्थित व्याख्या होणे आवश्यक आहे. एका टिपणासह मी जातींची व्याख्या करेन. जिला आपण सगळ्यांनी कृपया लक्षात ठेवायचे आहे. हे टिपण म्हणजे, जातीचे वेगळे असे स्वतंत्र अस्तित्व असूच शकत नाही तर अनेक जाती असल्यावरच तिचे अस्तित्व जाणवते. खरे पाहता जात ही एकटी अशी नसतेच किंबहुना 'अनेक जाती' ह्या मात्र असतात. याचे मी आपणास एक उदाहरण देतो. स्वतःकरीता जाती बनवितांना ब्राह्मणांनी ब्राह्मणेत्तरांत जातींची निर्मिती केली. माझ्या मते हे स्पष्ट करावयाचे झाल्यास स्वतःला कोंडून घेतांना ब्राह्मणांनी इतरांना बाहेर राहण्यास बाध्य केले. आणखी एक उदाहरण देवून माझे मी मत स्पष्ट करतो. आता भारताकडे पहा. भारतात हिंदू, मुस्लिम, शीख, पारशी आणि ख्रिश्चन असे स्वतंत्र समुदाय स्वतःच्या वेगळेपणासह अस्तित्वात आहेत. परंतु या सगळ्यात केवळ हिंदू सोडले तर इतरांत मात्र जाती आढळत नाही. एकमेकांनी व्यवहार करतांना या जातीचे वेगळेपण लक्षात येते. जर वरील चारही धार्मिक समुदाय स्वतःला बंदिस्त करून घेतील तर पारशी सुद्धा आपोआप बाहेरच्या बाहेर राहण्यास बाध्य होतील. सांकेतिकरीत्या सांगावयाचे झाल्यास पहिला जर सजातीय विवाहप्रथेचे पालन करीत असेल तर दुसऱ्यालादेखील तसेच करणे भाग पडेल.

आता हीच गोष्ट हिंदू समाजाला लागू करू या. आपणापुढे यापूर्वीच एक व्याख्या मांडण्यात आलेली आहे. आपणास माहित आहे की हिंदू समाजाला जर कुठली बाब वंशपरंपरेने मिळाली असेल तर ती म्हणजे 'स्वतःपुरतेच मर्यादित राहणे' होय. माझ्या या नवमताचे नैतिकवाद्यांना संशय येऊ शकतो की जातींच्या निर्मितीला धार्मिक व सामाजिक कायदे जबाबदार आहेत. एखाद्या जातीच्या असंतुष्ट लोकांना असे वाटणे सहज संभव आहे की मनूने त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे हव्या असलेल्या जातींमध्ये सामिल करून घेण्याची संधी न देताच बहिष्कृत करून

टाकले. जातीचे नियम हे फारच कठोर असतात आणि त्यांच्या उल्लंघनाचे दुष्परिणामही तितकेच भयंकर. नवीन विचारधारा एका नवीन जातीची निर्मिती करते कारण जुन्या जातीशी त्यांचा वाद निर्माण होतो. वाईट विचारांच्या लोकांना गुरू मानून प्रतिष्ठापित करण्यात येते. अवैध प्रेमसंबंध केलेल्यांना देखील जातीत दंडाचे प्रावधान असते. हा दंड असतो खान-पानावरील बंदी. याचा परिणाम असा होतो की अशा दंडित लोकांची मिळूनच एक जात निर्माण होते. हिंदूंच्या जातीत असे दंडित झालेले लोक त्या जातीसमोर नसून त्यांच्यातच राहू इच्छितात. मात्र तशी त्यांना परवानगी मिळावयास हवी. परंतु जात ही स्वतःपुरतीच मर्यादित झालेला समुदाय असल्याने बहिष्कृत केलेल्या लोकांना ते जातीबाहेर घालवू शकतात. नंतर असेच बहिष्कृत झालेले लोक स्वतःची एक नवीन जात बनवितात. जातीचा हा कायदा फारच निर्दयी असा आहे. ज्यामुळे प्रत्येक जातीला स्वतःला मर्यादित करावे लागते. कारण इतरांनीदेखील स्वतःलाच कोंडून घेतलेले असते आणि याचा दुष्परिणाम हा आहे की जातींनी बहिष्कृत अथवा वाळीत टाकलेल्या लोकांपासून आपोआप नवनवीन जातीमध्ये परिवर्तित होत असतो. भारतामध्ये असंख्य जाती निर्माण होण्यामागे हिच प्रक्रिया जबाबदार आहे. तेव्हा मुख्य सिद्धांताला संपवितांना मी म्हणतो की, जातींचे अध्ययन करणाऱ्या संशोधकांनी अनेक चूका केलेल्या आहेत. किंबहुना संशोधनाचा मार्गच बंद करून टाकला आहे. जातीचे अध्ययन करणाऱ्या युरोपियन विद्वानांनी व्यर्थपणे या बाबीवर विनाकारण जोर दिलेला आहे की जातींची निर्मिती वर्णाच्या आधारावर झालेली आहे. त्यांनी जातीच्या निर्मितीला हेच तत्त्व कारणीभूत मानलेले आहे. परंतु हे सत्य नाही. डॉ. केतकरांनी सत्य सांगितले आहे की सर्व राजे मग ते आर्य असोत वा द्रविड 'आर्यच' म्हणवित असत. जेव्हापर्यंत विदेशातील लोकांनी तसे म्हटले नाही. भारतीय लोकांना या बाबीशी काही देणेघेणे नव्हते की कोण द्रविड आणि कोण आर्य. 'त्वचेचा रंग हा या देशात जातीच्या निर्मितीचा 'मापदंड' म्हणून कधीही राहिलेला नाही.' ते आपल्या या एका गोष्टीचा पुनरूच्चार करीत वारंवार सांगतात की जातीचा निर्मितीचा हाच सिद्धांत आहे. या देशात धर्म आणि व्यवसायाशी संबंधित असलेल्या जाती अस्तित्वात आहेत. परंतु त्यांचा हा सिद्धांत जातींच्या निर्मितीकरिता कारणीभूत ठरू शकत नाही. आपणास ही गोष्ट माहित करून घ्यावयाची आहे की व्यावसायिक वर्ग हे जातीमध्ये कसे परिवर्तित झाले? या प्रश्नाचा कधी विचारच केला गेला नाही. याचा दुष्परिणाम हा झालेला आहे की, चुटकी वाजवताच निर्माण व्हाव्यात इतक्या सहजपणे जाती ह्या निर्माण झाल्या, असा समज सर्वत्र पसरविला गेला. या विपरीत हे मान्य केल्या जावू शकत नाही. कारण की जातीनिर्मितीची प्रक्रिया ही फारच जटील अशी आहे. जातींच्या

निर्मितीमागे धार्मिक विश्वास आहे हे सत्य आहे. परंतु असे धार्मिक विश्वास जातीच्या निर्मितीपूर्वीही मजबूतीने अस्तित्वात होते.

जातींच्या प्रश्नांविषयी माझ्या अभ्यासाचे चार पक्ष आहेत -

१. **हिंदू प्रजा ही संमिश्र प्रकारची असूनसुद्धा तिच्यात एक पराकाष्ठेची सांस्कृतिक एकता आहे.**

२. **जात ही एका विराट संस्कृतीची काही अंशात्मक अंग आहे.**

३. **सुरूवातीला केवळ एकच जात अस्तित्वात होती.**

४. **या वर्गातील अनुसरणाच्या आणि बहिष्काराच्या माध्यमातून जाती निर्माण झालेल्या आहेत.**

या अनैतिक रूढीला नष्ट करण्यासाठी अविरत प्रयत्न करण्यात येत असल्यामुळे आज-काल भारतात जातीसमस्येने एक वेगळे वळण घेतलेले आहे. सुधारणेचे हे प्रयत्न जातींच्या निर्मितीच्या या वादातून उत्पन्न झालेले आहेत की जातीप्रथा ही वरच्या वर्गाद्वारे निर्मित करण्यात आलेली आहे अथवा विकासाच्या मार्गावर असलेल्या समाजात सहजपणे उत्पन्न झालेली आहे? जे व्यक्ती माझ्या नंतरच्या विचारांवर विश्वास करतील त्यांच्याकरिता सुयोग्य सामग्री माझ्या या प्रबंधात मिळेल.

व्यावहारिक दृष्ट्या हा विषय महत्त्वाचा असतानाच जात ही सर्वव्यापी पसरलेली व्यवस्था आहे आणि ज्या विचारांना मी योग्य समजतो व ज्यावर ही व्यवस्था टिकून आहे त्या जातीव्यवस्थेची सैद्धांतिक बाजू जाणून घेण्याची आकांक्षा माझ्यामध्ये निर्माण झाल्यामुळे मी आपणासमोर आपले विचार प्रस्तुत करू शकलो.

इतरांपेक्षा माझे योगदान हे मोठे आहे किंवा माझे विचार हे अंतिम आहेत हे म्हणण्याइतपत मी घमेंडखोर नाही. मला असे वाटते की इतरांची विचारसरणी ही चुकीच्या मार्गावर आरूढ झालेली आहे आणि या प्रबंधाचा प्राथमिक उद्देश्य हे सांगणे आहे की संशोधनाचा योग्य मार्ग कोणता आहे जेणेकरून सत्य बाहेर येईल. आपणास या विषयाच्या विश्लेषणाच्या संदर्भात निष्पक्षपणे राहण्याचे आहे. या गोष्टीत भावनेच्या ओघात वाहून जाता कामा नये. उलट या विषयावर वैज्ञानिक आणि निष्पक्ष दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे. मला या गोष्टीचा आनंद वाटतो की माझा दृष्टिकोण हा सत्य दृष्टिकोणापासून मांडण्यात आलेला आहे आणि वादाचा मुद्दा हा फक्त तार्किक एवढाच आहे. तरीही काही मुद्यांबाबत असहमती ही कायम राहू देखील शकते. जाती कशा उत्पन्न झाल्या याबद्दल जो सिद्धांत मी मांडलेला आहे त्याबद्दल मला अभिमान वाटतो. याउलट माझा सिद्धांत जर कोणी खोडून काढला तर तो त्यागण्यास मी सहर्ष तयारी राहील.

✡✡✡